नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२ Issue - 12 | वार गुरुवार दि. २९ मे २०२५ Blow- Thursday Date 29 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# खरीप हंगामासाठी विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ



## केंद्र सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय; सुधारित कृषी व्याज अनुदान योजनेला मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आगामी खरीप हंगामासाठी विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत (एमएसपी-हमीभाव) वाढ करतानाच केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी २०२५-२६ साठीच्या सुधारित कृषी व्याज अनुदान योजनेला मुदतवाढ देण्यासही मंजुरी दिली. याशिवाय वर्धा-बल्लारशाह रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासह तीन पायाभूत सुविधा प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीच्या (सीसीईए) बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात आले. त्याची केंद्रीय माहिती मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

२०२५-२६ च्या आगामी खरीप हंगामासाठी (जुलै-जून) सामान्य आणि 'अ' दर्जाच्या वाणांसाठी आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे. भाताच्या (धान) हमीभावात २,३२० रुपयांवरून २,३८९ रुपये वाढ करण्यात आली आहे. ज्वारी (हायब्रिड) चा किमतीत ३,३७१ रुपयांवरून ३,६९९ रुपये आणि ज्वारी (मालदांडी) मध्ये ३,४२१ रुपयांवरून ३,७४९ रुपये वाढ करण्यात आली आहे. बाजरी (मोती) चा हमीभाव २,६२५ वरून २,७७५ रुपये, नाचणी ४,२९० वरून ४,८८६ रुपये, कपाशी ७,७१० वरून ८,११० रुपये आणि मका २,२२५ वरून २,४०० रुपये अशी हमीभावांतील वाढ असेल.

अन्य पिकांची हमीभाव वाढ अशी - तूर डाळ (७,५५० वरून ८,००० रुपये) मूग (८,६८२ वरून ८,७६८ रुपये) उडीद (७,४००वरून ७,८०० रुपये) भुईमूग (६,७८३ वरून ७,२६३ रुपये)

अश्विनी वैष्णव म्हणाले की, गेल्या १०-११ वर्षात खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत सातत्याने वाढवण्यात आली आहे. नवीन हमीभावांमुळे सरकारी तिजोरीवर २ लाख ७ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडेल. मागच्या वर्षाच्या हंगामापेक्षा ही रक्कम ७ हजार कोटी रुपयांनी जास्त आहे. किमान आधारभूत किंमत पिकाच्या खर्चापेक्षा किमान ५०% जास्त असेल याची काळजी घेण्यात आली आहे, असेही वैष्णव म्हणाले.

दरम्यान, व्याज अनुदान योजनेत वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना १.५ ते ३% अतिरिक्त व्याज अनुदानाचा लाभ २०२५-२६ साठी किसान क्रेडिट कार्डची सुधारित व्याज अनुदान योजना सुरू ठेवण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे. शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) द्वारे परवडणाऱ्या दराने अल्पकालीन कर्ज मिळते. देशात ७.७५ कोटींहून अधिक केसीसी खाती आहेत. सरकारने पुढील आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी व्याज अनुदान योजना सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे. यासाठी आवश्यक निधीचाही निर्णय घेण्यात आला आहे. केसीसीमध्ये शेतकऱ्यांना ७% व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते. यात बँकांना १.५% व्याज अनुदान मिळते. केवळ पशुपालन किंवा मत्स्यपालन कर्जावरील व्याज २ लाख रुपयांपर्यंतचा लाभ मिळतो.ही योजना सुरू ठेवल्याने सरकारी तिजोरीवर १५,६४० कोटी रुपयांचा भार पडेल असेही वैष्णव म्हणाले. केसीसी द्वारे संस्थात्मक कर्ज वितरण २०१४ मध्ये ४.२६ लाख कोटी रुपयांवरून डिसेंबर २०२४ पर्यंत १०.०५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. एकूण कृषी कर्ज प्रवाह २०१३-१४ मध्ये ७.३ लाख कोटी रुपयांवरून २०२३-२४ मध्ये २५.४९ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

एमएसपी'मध्ये समाविष्ट असलेली पिके : धान्य - गहू, मका, बाजरी, ज्वारी, नाचणी आणि बार्ली)

डाळी - चणा, तूर/तुअर, उडीद, मूग आणि मसूर

तेलबिया - रेपसीड-मोहरी, शेंगदा, सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, करडई, काजू

व्यावसायिक पिके- कपाशी, ऊस, खोबरे, कच्चा ताग

# चार राज्यांमध्ये आज मॉक ड्रिल होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: भारत-पाकिस्तान सीमेवरील ४ राज्यांमध्ये पुन्हा एकदा मॉक ड्रिल होणार आहे. त्याबद्दलचे आदेश देण्यात आलेले आहेत. गुजरात, पंजाब, राजस्थान आणि जम्मू-काश्मीरमध्ये उद्या म्हणजेच २९ मे रोजी सुरक्षा मॉक ड्रिल करण्यात येईल. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताकडून पहिल्यांदाच मॉक ड्रिल करण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदूर ६ आणि मेच्या रात्री करण्यात आलं. या ऑपरेशनच्या अंतर्गत भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले.

ऑपरेशन सिंदूरच्या आधी केंद्र सरकारनं देशव्यापी मॉक ड्रिलचे आदेश दिले होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतचे संबंध ताणले गेलेले असताना ७ मे रोजी देशातील २४४ जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिलची घोषणा करण्यात आली होती. पण ६ आणि ७ मेच्या रात्रीच भारतीय सैन्यानं पाकिस्तानविरुद्ध मोठी कारवाई केली. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा मॉक ड्रिलची घोषणा झाल्यानं पुन्हा काहीतरी मोठी कारवाई होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तशा चर्चांना उधाण आलेलं आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानचे संबंध अतिशय ताणले गेले. सीमेवर पाकिस्तानकडून सातत्यानं गोळीबार सुरु होता. पाकिस्तानला प्रत्युत्तर देऊन पहलगामचा बदला घेण्याची मागणी जोर धरु लागली होती. यानंतर ६ आणि ७ मेच्या रात्री भारतीय सैन्यानं ऑपरेशन सिंदूर राबवत आंतरराष्ट्रीय सीमेच्या १०० किलोमीटर आतपर्यंत हवाई हल्ले करत दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त केले. अवघ्या २५ मिनिटांत भारतीय हवाई दलानं संपूर्ण ऑपरेशन पूर्ण केलं.

२९ मे रोजी होणाऱ्या मॉक ड्रिलमध्ये नागरी सुरक्षेच्या तयारीचा आढावा घेतला जाईल. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य किती तयार आहेत, याचा आढावा घेण्यात येईल. लोकांनी सावध, सतर्क राहावं. कोणत्याही परिस्थितीत गोंधळून जाऊ नये, हा मॉक ड्रिलचा हेतू आहे.

सिव्हिल डिफेन्स मॉक ड्रिलच्या माध्यमातून नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत नेमकं काय करायचं आणि काय टाळायचं याचे धडे दिले जातात. संकटाच्या स्थितीत स्वत:ला कसं वाचवायचं, दुसऱ्यांना कशी मदत करायची, याचं मार्गदर्शन मॉक ड्रिलच्या माध्यमातून केलं जातं. युद्ध किंवा आपत्तीच्या परिस्थितीत मॉक ड्रिल महत्त्वाचं ठरतं.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या मास्टर प्लॅनला मंजूरी

### स्थानिक कारागिरांच्या पुर्नवसनाला सर्वोच्च प्राधान्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : धारावी हे देशातील वैशिष्ट्पूर्ण उद्योग समूहांचे विस्तीर्ण क्षेत्र आणि महत्वाचे आर्थिक केंद्र आहे. त्यादृष्टीने धारावीच्या मूळ संकल्पनेचे जतन करत पर्यावरणपूरक आणि एकात्मिक पद्धतीने विकास करावा, स्थानिक कारागिरांच्या, व्यावसायिकांच्या पुनर्वसनाला धारावी पुनर्विकास प्रकल्पात सर्वोच्च प्राधान्य देऊनच प्रकल्प राबवण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**धारावीचा पुर्नविकास पर्यावरणपूरक आणि एकात्मिक पद्धतीने करणार : मुख्यमंत्री**

सह्याद्री अतिथी गृह येथे धारावी पुनर्विकास प्रकल्प आढावा बैठक मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच संबंधित सर्व वरिष्ठ अधिकारी, यंत्रणाप्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धारावीचा पुर्नविकास पर्यावरणपूरक आणि एकात्मिक पद्धतीने करावयाचा असून धारावीतील व्यावसायिक उलाढाल सर्वात महत्त्वाचा भाग आहे. त्याला प्राथमिकता देत या ठिकाणच्या गुणवंत कारागिरांना, त्यांच्या कौशल्य आधारित विविध व्यवसायांच्या पुनवर्सनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. येथील मूळ रहिवासी असलेल्या प्रत्येकाला घर द्यायचे आहे. धारावीमधील प्रत्येकाला पुनर्वसन प्रकल्पात न्याय मिळाला पाहिजे, येथील प्रत्येकजण या पुर्नविकास प्रकल्पासाठी पात्र असणार आहे, त्याचे निकष वेगवेगळे असतील, मात्र धारावीतील प्रत्येकाला पुर्नवसनाचा लाभ मिळाला पाहिजे, याची खबरादारी घेण्यात यावी. ठरल्याप्रमाणे नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना विकासप्रकल्पात देय असलेली जागा देण्यात यावी. धारावीची मूलभूत व्यावसायिक ओळख जपून, मूळ वैशिष्ट्यांना सुरक्षित ठेऊन धारावी विकास प्रकल्पाची संकल्पना राबवावी. यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक तो समन्वय ठेवावा. स्थानिक जनतेला विश्वासात घेऊन लोकभावना जपून समन्वयपूर्वक विकासाची कामे करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सर्व संबंधित विभागांनी विकास प्रकल्पासाठी आवश्यक ती मान्यता, पुढील कार्यवाही तत्परतेने करण्याचे निर्देश दिले.

धारावी पुर्नविकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उपमुख्यमंत्री (नगरविकास) कार्यालयाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता , प्रधान सचिव नवीन सोना, महानगर आयुक्त (एम एम आरडीए ) संजय मुखर्जी, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्यासह संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश**

**आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा**

# आषाढी वारी सर्व विभागांच्या समन्वयातून यशस्वी करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंढरपुरची आषाढी वारी पूर्वापार चालत आलेली परंपरा असून वारी आणि वारकरी राज्याचे वैभव वाढविणारी आहे. यामुळे यंदा पावसाचे आगमन लवकर झाल्याने सर्व मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांना फिरती शौचालये, पाणी, आरोग्य आणि पोलीस बंदोबस्तासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. ही वारी यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले, यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते.

पुण्याच्या प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वारीच्या तयारीची माहिती सादरीकरणातून दिली. त्यानंतर प्रमुख दिंडीचे प्रतिनिधी, विश्वस्त यांनी वारीसंबंधात सूचना, अडचणी मांडल्या. पुणे शहराच्या ठिकाणी विविध स्वागत मंडप, लाऊड स्पीकरवर बंदी असावी, प्रत्येक पालख्यांना जास्तीचा पोलीस बंदोबस्त, अरूंद रस्त्यांचे रूंदीकरण, वाखरी मॉडेल वारकरी तळ, पालखीसोबत साध्या अम्ब्युलन्ससोबत कार्डियाक अम्ब्युलन्स, दर्शन पासची संख्या, वॉटर प्रूफ टेंट, पाण्याचे टँकर, मुबलक औषध साठा, पालख्यांच्या पारंपरिक मार्गाचा विकास, फिरती शौचालये, वाखरी वारकरी तळ मॉडेल करण्याच्या सूचना मांडण्यात आल्या.

**वाखरी मॉडेल वारकरी तळ करणार**

**सर्व संतांच्या मानाच्या पालख्या वाखरीजवळ एकत्र येतात. राज्यभरातून शेकडो पालखी सोहळे पायी पंढरीची वाट चालत असताना पालख्यांच्या स्वागतासाठी संत नामदेव महाराजांची पालखी वाखरी येथे जातात. यामुळे याठिकाणी पालख्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. सोलापूर जिल्हा प्रशासनाने गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी योग्य नियोजन करून दक्षता घ्यावी. नामदेव महाराज यांचा असलेला ओट्याचा पुनर्विकास करावा. गर्दी लक्षात घेवून वाखरीचे विशिष्ट मॉडेल वारकरी तळ होण्यासाठी आराखडा तयार करणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे, मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी.

विभागीय आयुक्तांनी समन्वयाने काम करावे

राज्यातील विविध भागातून पालख्या पंढरपूरला येतात. नाशिक, विदर्भ, मराठवाडा याठिकाणाहून येणाऱ्या पालख्यांना पालखी मार्गात सोयीसुविधा देण्यासाठी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागीय आयुक्तांनी समन्वयांनी बैठक घेवून उपाययोजना कराव्यात. आपापल्या जिल्ह्यातून पालख्या जाताना स्थानिक प्रशासनाने रस्ते, पाणी, वीज, पोलीस बंदोबस्त, आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी तत्काळ बैठका घेवून नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

पोलीस महासंचालक यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय करून पालख्यांच्या बंदोबस्ताची, वाहतूक, अपघात होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. किमान महत्वाच्या मानाच्या पालख्यांना सेवा राहील याची व्यवस्था करावी. जिल्ह्याची हद्द संपते तेव्हा पोलीस बंदोबस्तावेळी दुसऱ्या जिल्ह्याने अगोदरच हजर राहून कोणतीही पालखी, दिंडी पोलिसांविना राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

यावर्षीही राहणार समूह विमा

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी सुमारे १५ ते २० लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने मागील वर्षी 'विठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

निर्मल वारी, हरित वारीसाठी काम वाढवून आराखडा करा

वारी कालावधीमध्ये निर्मल वारी, हरित वारी हा उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. पालखी मार्गातील त्या-त्या जिल्ह्यातील प्रशासनाने निर्मल वारीचे अधिक काम होण्यासाठी प्रयत्नशील रहावे. शिवाय हरीत वारीने निसर्गाशी साधर्म्य राखण्यास मदत होत असल्याने याकडे गांर्भीयाने पहावे. रस्त्याची दुतर्फा देशी, सावली देणारी झाडे लावण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

३६ वॉटर प्रुफ मंडप

राज्यात पावसाचा जोर राहणार असल्याने वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी पालखी (पान २ वर...)

संपादकीय....

## पुन्हा मॉक ड्रील

भारत-पाकिस्तान सीमेवरील ४ राज्यांमध्ये पुन्हा एकदा मॉक ड्रिल होणार आहे. त्याबद्दलचे आदेश देण्यात आलेले आहेत. गुजरात, पंजाब, राजस्थान आणि जम्मू-काश्मीरमध्ये उद्या म्हणजेच २९ मे रोजी सुरक्षा मॉक ड्रिल करण्यात येईल. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताकडून पहिल्यांदाच मॉक ड्रिल करण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदूर ६ आणि मेच्या रात्री करण्यात आलं. या ऑपरेशनच्या अंतर्गत भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूरच्या आधी केंद्र सरकारनं देशव्यापी मॉक ड्रिलचे आदेश दिले होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतचे संबंध ताणले गेलेले असताना ७ मे रोजी देशातील २४४ जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिलची घोषणा करण्यात आली होती. पण ६ आणि ७ मेच्या रात्रीच भारतीय सैन्यानं पाकिस्तानविरुद्ध मोठी कारवाई केली. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा मॉक ड्रिलची घोषणा झाल्यानं पुन्हा काहीतरी मोठी कारवाई होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तशा चर्चांना उधाण आलेलं आहे. २९ मे रोजी होणाऱ्या मॉक ड्रिलमध्ये नागरी सुरक्षेच्या तयारीचा आढावा घेतला जाईल. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य किती तयार आहेत, याचा आढावा घेण्यात येईल. लोकांनी सावध, सतर्क राहावं. कोणत्याही परिस्थितीत गोंधळून जाऊ नये, हा मॉक ड्रिलचा हेतू आहे. सिव्हिल डिफेन्स मॉक ड्रिलच्या माध्यमातून नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत नेमकं काय करायचं आणि काय टाळायचं याचे धडे दिले जातात.

## आषाढी वारी सर्व विभागांच्या समन्वयातून यशस्वी करा

(पान १ वरून...) मुक्काच्या ठिकाणी ३६ वॉटर प्रुफ मंडपाची तयारी केली आहे. आवश्यकता भासल्यास आणखी वॉटर प्रुफ मंडप वाढविण्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

वारीमध्ये प्रयागराजच्या धर्तीवर महिलांचाही विचार करण्यात आला. हिरकणी कक्षासह महिलांना स्नानासाठी वेगळी स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**वारकऱ्यांची गैरसोय टाळणार– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

यंदा राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने विविध मानाच्या पालख्यांच्या सूचना लक्षात घेवून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता शासन घेणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. फिरते शौचालये, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, वॉटर प्रुफ टेंट, जास्तीत जास्त आरोग्यसुविधा पुरविण्यात येणार आहे. अम्ब्युलन्सबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता आरोग्य विभाग घेईल. महिलांच्या आरोग्याबाबतही विशेष काळजी घेण्यात आली असून वारकऱ्यांना अधिक बसेस, रेल्वे उपलब्ध होण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. रस्त्यावर चिखल होणार नाही, ते सुस्थितीत राहतील याची दखल घेवू, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी वारकरी, पालख्यासाठी विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीने केलेल्या सोयीसुविधांबाबतची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांनी दिली. यावेळी विविध पालखी संस्थानच्या वतीने योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर महाराज, जालिंदर मोरे, सोमनाथ घाटेकर, अक्षय महाराज भोसले, श्री. साधू यांनी समस्या, सूचना मांडल्या.

# संघर्षनायक : अ‍ॅड. राहुल मखरे (वकीलसाहेब) एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वाढदिवस विशेष
(दि.२९ मे २०२५)




हजरजबाबीपणा हा बुद्धी चातुर्याचा गुण अ‍ॅड. राहुलदादा मखरेंकडे असल्यामुळे तल्लख विलक्षण बुद्धीमत्तेने समोरच्या व्यक्तींच्या मनात अल्पावधीतच आपले स्थान निर्माण केले आहे. नेतृत्व, वक्तृत्व, आणि कर्तृत्व या त्रिवेणी संगमाचा मिलाप म्हणजे वकीलसाहेब. कोणत्याही प्रसंगात मिश्किल, विनोदी शैली त्यांच्या वाणीत पहावयास मिळते. नेतृत्व करायला वय लागत नाही, लागत ते साहस, बुद्धी, चातुर्य आणि निर्णय क्षमता..! हे वकीलसाहेबांच्या बुद्धीचातुर्यातून सहज दिसून येते.

कॉलेज जीवनापासून नेतृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या अष्टपैलू व्यक्तिमत्वास वाढदिवसानिमित्त उदंड दीर्घायुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!!

महाविद्यालयीन जीवनातच वकील साहेबांना सामाजिक कार्याची गोडी लागली.

प्रेमाने संवाद साधणारे वकीलसाहेब कित्येकदा सामाजिक कार्य करताना सर्वांना आनंद देणारे युवा नेतृत्व भावतात. प्रभावीत करण्याची कला व क्षमता यांचा अनोखा संगम म्हणजे अ‍ॅड. राहुलदादा मखरे (वकील साहेब)!

सार्वजनिक क्षेत्रात काम करत असताना व्यावसायिक दृष्टिकोन बाजूला ठेवून सर्वांना मदतीचा हात देणारे वकीलसाहेब. अहोरात्र कष्ट करताना, जनहित डोळ्यासमोर ठेवून कल्पकतेने आपल्या उच्च शिक्षणाचा ठसा सामाजिक कार्यात उमटवताना वकीलसाहेब आपणास दिसून येतात. एका निष्णात विधीज्ञाच दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्वातून पहावयास मिळते.

कोणतेही काम हातात घेतले की, त्याचा पाठपुरावा करून ते पूर्ण होईपर्यंत न थांबणारे व्यक्तिमत्व म्हणजे वकील साहेब. त्यांच्या कामातलं सातत्य नेहमीच लोकांना प्रभावित करते. त्यामुळे वकील साहेबांकडे घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला आपलं काम खात्रीने होणार असा विश्वास वाटतो.

सामाजिक कार्याचा वसा आणि वारसा वडील आदरणीय रत्नाकर मखरे (तात्या) यांच्याकडून वकील साहेबांना लाभलेला आहे. समाजातील लोकांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन सोडवणुकीसाठी शाश्वत उपाययोजना करण्याकडे त्यांचा कल असतो. तात्पुरती मदत ही ठराविक काळासाठी असते आणि शाश्वत उपाय योजना ही एखाद्या अडीअडचणीचे समाधान असते. हा विचार वकीलसाहेबांचा आहे.यामुळेच समाजाभिमुख व्यक्तिमत्व म्हणून वकीलसाहेबांची ओळख पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रभरातील लोकांसह मित्र परिवाराला झाल्याशिवाय राहत नाही.

विचारांची उंची ही सुसंस्कृतपणावरच अवलंबून असते, हा गुण संस्कारांनी निर्माण होतो. संस्काराचे दर्शन वकीलसाहेबांच्या वागण्या बोलण्यातून नेहमीच जाणवते. संस्कारक्षम पिढी निर्माण होण्यासाठी अशा सुसंस्कृत व्यक्तिमत्वाची गरज समाजाला असते. ती गरज वकीलसाहेबांसारख्या व्यक्तिमत्वामुळे पूर्ण होते.सामाजिक जीवनात काम करत असताना विवेकशीलतेला खूप महत्त्व आहे. कोणताही सामाजिक निर्णय घेत असताना निरपेक्ष, विवेकी निर्णय घ्यावा लागतो. ज्यामुळे कोणावरही अन्याय होत नसतो. वकीलसाहेब कोणताही निर्णय अत्यंत जाणीवपूर्वक विचार करून घेतात. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय हा विवेकशीलतेचे दर्शन घडवतो.

विचारांचं बाळकडू हे वडील रत्नाकर मखरे (तात्या) यांच्याकडून मिळाल्यामुळे अगदी कोणत्याही विषयावरती त्यांचे विचार हे अभ्यासपूर्ण, परिपक्व आणि सामाजिक बांधिलकी जपणारे असतात.

गोरगरिबांच्या, कष्टकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी त्यांचा सतत प्रयत्न दिसतो. अविरत कष्ट करण्याची तयारी उपजतच वकील साहेबांना लाभली आहे. आपल्या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून समाज उपयोगी उपक्रम घेण्यात मार्गदर्शक म्हणून त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. पद असो वा नसो विधायक कामं करून नावलौकिक वाढवता येतो, याचे उत्तम उदाहरण अ‍ॅड. राहुलदादा मखरे (वकील साहेब) हे आहेत. वकीलसाहेबांनी सामाजिक, राजकीय जीवनात बामसेफ संघटना, भारत मुक्ती मोर्चा,बहुजन मुक्तीपार्टीत मिळालेल्या जबाबदाऱ्या निर्भीडपणे पार पाडल्या. राजकीय घडामोडीनंतर वकील साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरद पवार गट) जाण्याचा निर्णय कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन केला. लोकसभेच्या निवडणुकीनंतर पक्ष श्रेष्ठींनी महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश सरचिटणीसपदासंह प्रवक्ते पदाची जबाबदारी दिली. पक्षप्रमुख राष्ट्रीय नेते शरद पवार साहेबांच्या मार्गदर्शनात पक्षाची प्रतिष्ठा,निष्ठा राखत स्वतःला झोकून देऊन पक्ष वाढीसाठी आणि समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळण्यासाठी वकीलसाहेब काम आहे.

लोकांना न्याय मिळावा यासाठी वेळप्रसंगी संघर्ष, आंदोलनं, रास्ता रोखो, उपोषणं केली. प्रसंगी तुरुंगवास देखील वकील साहेबांना भोगावा लागला. यामुळे लोकांची जोडली गेलेली नाळ अधिक घट्ट झाली आहे. तसेच मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर या नामांकित शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष या पदावर कार्यरत आहे. युवकांमध्ये वकील साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा पाहावयास मिळतो.

एप्रिल २०२० च्या अखेरीस कोरोना काळात ज्यांच्या हाताला काम नव्हते, ज्यांची हातावरची पोटं होती.ज्यांची रोज कामधंदा केल्याशिवाय घरची चूल पेटत नव्हती अशा लोकांना माजी नगराध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरे (तात्या) व अ‍ॅड. राहुल मखरेंनी (वकीलसाहेब) इंदापूर शहरातील आंबेडकरनगर,साठेनगर, होलारवाडा, व्यंकटेशनगर आदी भागातील गोरगरीब, गरजूंना गहू,तांदूळ आदी धान्याचे ४० ते ४५ पोते वाटप व जीवनावश्यक वस्तूंचे देखील वाटप केले. वकील साहेबांनी तालुक्यातील कोरोना रुग्णांना सर्वतोपरी वैद्यकीय मदत केली.यातून आपल्याला त्यांची जनसेवेची तळमळ दिसून येते.

समाजकार्यातून राजकारण करणारी ही व्यक्ती असल्यामुळे समाज मनावर त्यांच्याबद्दल आदर आणि मैत्रीच्या भावना सबंध राज्यभर पाहावयास मिळतात.

कोरेगाव भीमा चौकशी आयोग प्रकरणी वकीलसाहेब कायदेशीर लढाई लढत आहे. त्यांनी राष्ट्रीय नेते शरद पवार साहेबांची क्रॉस एक्झामिनेशन घेतली. अ‍ॅड. राहुल मखरे साहेबांचे आपल्या वकीलीचे कसब या आयोग प्रकरणी दिसून येत आहे.




पुण्य परोपकार पाप ते परपीडा!

या भूमिकेतून पक्षीय भेदाभेद न बाळगता लोकांची, कार्यकर्त्यांनी कामे वकीलसाहेब अपेक्षेविना करत असतात. व्यावसायिक वकिली अ‍ॅड. राहुल मखरेंनी कधी केली नाही.

गोरगरीबांसाठी ते अत्यल्प फी मध्ये वकिली करतात. आणि कार्यकर्त्यांसाठी विनाशुल्क वकिली करतात. म्हणून ड.राहुल मखरे साहेब हे खऱ्या अर्थाने जनतेचे वकीलसाहेब झाले.

केंद्र सरकारने ओबीसींची जनगणना करावी यासाठी वकील साहेबांनी आंदोलनं केली. त्यांचं नेतृत्व अधिक उमेदीने पुढं येऊ लागलं.

त्यांचा मित्रपरिवार हा इंदापूर तालुक्याच्या सीमा पार करून जिल्ह्यातील अनेक तरुण सहकाऱ्यांना बरोबर घेऊन सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे काम वकील साहेबांच्या हातून होत आहे. असा विश्वास राज्यातील तरुणांना आहे.

शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारधारेने प्रेरित होऊन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात निष्ठेने अविरत काम सुरु आहे. बहुजन महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिन या कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहतात. बहुजन महापुरुषांच्या कार्याचा वसा आणि वारसा तरुणांनी कसा घ्यावा, या संदर्भात मार्गदर्शन करतात, राष्ट्रीय सण, उत्सवाच्या वेळी समाजात देशभक्ती वाढावी म्हणून अनेक कार्यक्रमांमध्ये आवर्जून आपली उपस्थिती दर्शवितात.

एका संवेदनशील आणि सामाजिक भान असणा-या, कृतिशील, आक्रमक, संघर्षशील व्यक्तिमत्व असलेल्या वकील साहेबांचा आज ५० वा वाढदिवस आहे. वकीलसाहेबांनी सामाजिक बांधकी जपत उद्याच्या नेतृत्वाची चुणूक आपल्या कामातून दाखविली आहे. वडील रत्नाकर (तात्या) मखरेंच्या समृद्ध राजकारणाचा वारसा वकील साहेबांना मिळाला असला तरी प्रतिकूल आणि अनुकूल परिस्थितीत समाजहितासाठी लढण्याची धमक आणि अस्तित्व राखण्यासाठी कष्ट करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. कार्यकर्ते फक्त जोडायचेच नाहीत, तर ते टिकवयाचे कसे? याचे उत्तम उदाहरण म्हणजे वकीलसाहेब.

आमचे बंधुतुल्य, मार्गदर्शक वकील साहेबांची संघर्षशील व्यक्तिमत्व म्हणून ख्याती आहे. आपली धडाकेबाज कर्तव्यतत्परता, कृतिशील आक्रमकता कामातून दिसून येते. जनतेच्या समस्यांचे निराकरण करताना केला जाणारा पाठपुरावा. त्यासाठी उपलब्ध करून दिलेले पर्याय, अशा सर्वच पातळीवर केलेले कार्य. शांत, संयमी, मितभाषी, कणखर, कल्पक, चारित्र्यसंपन्न आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून अ‍ॅड. राहुलदादा मखरेंनी (वकीलसाहेब) तमाम युवा वर्गात नावलौकिक मिळवला आहे.

संघर्षनायक अ‍ॅड. राहुलदादा मखरे वकीलसाहेब यांना ५० व्या वाढदिवसानानिमित्त मनपूर्वक मंगलमय हार्दिक शुभेच्छा..!!

**शब्दांकन :**
**नानासाहेब सानप (सर)**
**भिमाई आश्रमशाळा, इंदापूर**

# माहिती विभाग आणि पत्रकार संघाच्या विद्यमाने विकास पत्रकारिता कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विभागीय माहिती कार्यालय पुणे आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार भवन येथे माध्यम प्रतिनिधींना पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विकास पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी राज्य अधिस्वीकृती समिती सदस्य एस. एम. देशमुख, स्वप्नील बापट, शरद पाबळे, विभागाचे माहिती उपसंचालक डॉ.किरण मोघे, पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे, पुणे सदस्य सुनीत भावे, चंद्रसेन जाधव, पुणे पत्रकार संघाचे खजिनदार शिवाजी शिंदे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव आदी उपस्थित होते.

डॉ. मोघे म्हणाले, माहिती व जनसंपर्क विभागाच्या संकेतस्थळावर पत्रकारांसाठीच्या योजनांची माहिती देण्यात आली आहे. प्रत्यक्ष पत्रकारांशी संवाद साधून त्यांच्यापर्यंत या योजना पोहोचविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विकास पत्रकारिता वास्तवाचा स्वीकार करणे, विश्लेषण करणे, मूल्यांकन करणे आणि सामाजिक जबाबदारी या चार पैलूंवर आधारीत आहे. अशा पत्रकारितेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनातर्फे विकास पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतात. यासोबतच पत्रकारांसाठी शासनाने विविध योजना सुरू केल्या आहेत.

स्व. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीतून विविध आजारांवरील



उपचारांसाठी अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना, त्यांच्यावर अवलंबून असणारे पती/पत्नी आणि दोन मुलांनाही १५ हजारापासून ते १ लाख रुपयांपर्यंत मदत मिळते. तसेच केंद्र शासनाच्या पत्रकार कल्याण योजनेअंतर्गतही अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि किमान ५ वर्षे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना अर्थसहाय्य करण्यात येते, अशी माहिती त्यांनी दिली. डॉ.मोघे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि अधि स्विकृती संबंधितच्या नियमावलीचीही माहिती दिली. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. पत्रकारांना योजनांचा लाभ देण्यासाठी माहिती विभागाची नेहमीच सकारात्मक भूमिका राहील, असेही डॉ.मोघे म्हणाले.

एस. एम. देशमुख म्हणाले, बहुसंख्य पत्रकारांना आपल्या लाभाच्या योजनाची माहिती नसल्याने योजनांपासून वंचित राहत होते. त्यामुळे माहिती व जनसंपर्क विभागाने या योजनांच्या माहितीची पुस्तिका काढून त्याचे वितरण करावे. शासकीय योजनांचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी शासनाकडे राज्य अधिस्विकृती समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे. अधिस्वीकृतीसाठी आपण कोणत्या संवर्गात पात्र ठरतो याचा अभ्यास करुन पत्रकारांनी अर्ज केल्यास अधिस्वीकृती मिळण्याची कार्यवाही लवकर होते, असेही ते म्हणाले. पत्रकारांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त असून कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक जिल्ह्यात व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

पत्रकार सन्मान योजनेंतर्गत प्रति लाभार्थी दरमहा ११ हजार रुपये सन्मान निधी देण्यात येतो. देशात इतकी मोठी रक्कम देणारी योजना राबविणारे इतर कोणतेही राज्य नाही. सन्मान योजनेचा लाभही अधिकाधिक पत्रकारांना मिळावा यादृष्टीनेही प्रयत्न होत आहेत. पत्रकारांनी योजनेची माहिती जाणून घ्यावी आणि अधिकाधिक अर्ज करावेत. त्याचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी प्रयत्न व्हावेत, असेही ते म्हणाले. यावेळी श्री. देशमुख यांनी अधिस्वीकृतीसाठीचा वरिष्ठ पत्रकार संवर्ग, कोटा पद्धती, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे आदींची माहिती देऊन याबाबत पुणे अधिस्वीकृती समितीकडून चांगला पुढाकार घेतल्याचे नमूद केले.

श्री. पाटणे म्हणाले, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका आणि अन्य योजनांची माहिती नसल्याने त्यांच्याकडून अर्ज येत नाहीत. मात्र गेल्या दीड वर्षात पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्यावतीने पत्रकारांना माहिती देण्यात आल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत, त्यामुळे ग्रामीण पत्रकारांना या सुविधेचा लाभ देता आला. अर्जाची काटेकोर तपासणी केली जातेच परंतु अर्जात काही त्रुटी असल्यास समितीकडून त्रुटी दूर होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाते. लवकरच सातारा येथेही अशी कार्यशाळा घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्री. भावे यांनी पत्रकारांसाठीच्या योजनांची पत्रकारांना माहिती असणे आवश्यक असून त्यासाठी पुणे श्रमिक पत्रकारसंघाने पुढाकार घेऊन कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित पत्रकारांच्या शंकांना उत्तरे देण्यात आली. विविध वृत्तपत्रांचे, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी कार्यशाळेस उपस्थित होते.

## घरचे बांधकामासाठी माहेरुन पाच लाख घेऊन ये म्हणून मानशिक व शारीरिक त्रास केल्या प्रकरणी पतीसह ५ जणांचे अटकपुर्व जामीन मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/अक्कलकोट

हकीकत असे की – नवी जिंदगी सोलापूर येथील राहणारा सर्फराज सलीम फानिबंद याचे सोबत मुस्कान याचे लग्न ३१/मे २०२३ रोजी झालेला होता सुरवातीचे ३ ते ४ महिने चांगले प्रकारे नादविल्या नंतर नवरा त्याचे आई चे बहिणीचे शिकावण्या वरून या ना त्या कारण पुढे करून शिवीगाळ, मारहाण करू लागला तसेच घरा शेजारी राहणार नवऱ्याचे आत्या, नणंद यांनी सुद्धा घर बांधकाम साठी पैसे माहेरून आण म्हणून त्रास देऊ लागले याच दरम्यान फिर्यादिस एक मुलं झाला, नवरा सर्फराज कामानिमित्त यादगीर, कर्नाटकात राहण्यास घेऊन गेले तेथे सुद्धा पतीचे मामा यांनीही पैसा चे कारणावरून मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याने दि २५/एप्रिल २०२५ रोजी एम ई डी पोलीस स्टेशन ला पती सर्फराज फणीबंद,सासू शनाज फणीबंद,पतीचे आत्या रजिया शेख, नणंद आर्फीन शेख, परवीन कानकुर्ती, पतीचे मामा महंमद खान, सायरा खान याचे विरुद्ध बी एन एस कायदा कलम ८५,११५(२),३५२,३५१(२),३(५) अन्वये फिर्याद मुस्कान फानिबंद दाखल केले होते.

सदर गुण्यात अटक होईल म्हणून ऍड राजेंद्र फताटे याचे मार्फत अटक पुर्व जमीन अर्ज पती सर्फराज, सासू शनाज, आत्या रजिया नणंद परवीन व आफ्रिन यांनी दाखल केले होते.

सदर अर्जाचे सुनावणी मे, जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री सुरज वी केंद्रे, याचे समोर होऊन, वरील सर्व आरोपीना २००००/ च्या जात मुचालक्या वर अटक पूर्व जामीन मंजूर केले. यात आरोपी /अर्जदार तर्फे ऍड राजेंद्र फताटे यांनी तर सरकार तर्फे प्रकाश जन्नू यांनी काम पहिले.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सोलापूर जिल्हा दौरा असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे गुरुवारी दिनांक २९ मे २०२५ रोजी सकाळी सात पंचेचाळीस वाजता शांताक्रुज विमान तळ येथून विमानाने सोलापूरकडे प्रयाण करतील व सकाळी०८.५५ जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे आगमन सकाळी०९.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे जिल्हाधिकारी यांची आढावा बैठक व सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे नोंदणी व मुद्रक विभाग तसेच भूमी अभिलेखा विभागाची आढावा बैठक दुपारी बारा वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्थानिक आमदार महोदय यांची समवेत बैठक दुपारी एक ते दुपारी एक ४५ वाजता राखीव दुपारी दोन वाजता ड्रीम पॅलेस पोलीस कल्याण केंद्र सेवासदन शाळेसमोर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहून दुपारी चार वाजता इस्टेट सोलापूर जिल्हा भाजप कोर कमिटी बैठक सायंकाळी पाच वाजता शिवस्मारक एसटी स्टँड इथे राखीव सायंकाळी साडेपाच वाजता मोटार येणे सोलापूर विमानतळाकडे प्रयान सोलापूर येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# द्राक्ष बागेत चिखल साचल्याने शेतकऱ्यांना ड्रोन द्वारे करावी लागते औषध फवारणी

## ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीतील अडचणींवर मात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/निफाड

निफाड परिसरात अवकाळी पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, बळीराजा आर्थिक संकटात सापडला असून द्राक्षांबरोबरच कांद्याचे ही मोठे नुकसान झाले आहे. त्यातच द्राक्ष बागांच्या फुटी कोवळ्या असल्याने व पावसाची अवस्था बुरशीजन्य रोगांना अनुकूल असल्याने महागडी आंतरप्रवाही बुरशीनाशक औषधे फवारण्याची नामुष्की द्राक्ष उत्पादकांवर आली आहे. त्यातच चिखलात ट्रॅक्टर चालत नाही. त्यामुळे




डिझेलच्या खर्चातही वाढ होते ,पाठीवरती पंप घेऊन औषध मारणे शक्य नाही म्हणून द्राक्ष उत्पादकांनी द्राक्ष बागेवरती ड्रोन द्वारे औषध फवारणी करण्यास सुरुवात केली आहे. ड्रोन द्वारे औषध फवारणी केल्याने पिकांवर अचूक आणि समान फवारणी होऊ शकते ज्यामुळे उत्पादन खर्चातही बचत होते आणि पर्यावरणाचे रक्षण होते शेतकऱ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीतील अडचणींवर मात करता येऊ शकते.

आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास असीच अवस्था मजुरांनी केली असून ऐन कामाचा हंगाम असताना ते आपल्या घरी गेले आहेत द्राक्ष उत्पादकांचे पूर्ण नियोजन बिघडले असून नैसर्गिक आणि अनैसर्गिक कचाट्यात शेतकरी वर्ग सध्या सापडला आहे.



अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागेवर फवारणी करण्याचे मोठे संकट आम्हा शेतकऱ्यांसमोर उभे होते शेतात पाणी साचल्यामुळे व चिखल झाल्याने पाठीवर पंप घेऊन किंवा ट्रॅक्टर द्वारे बागेला फवारणी करणे अशक्य झाले होते परंतु ड्रोनच्या साह्याने तिस एकर द्राक्ष बागेवर फवारणी केली एक एकरासाठी चार मिनिटे वेळ लागला व एकसमान औषध द्राक्ष बागेवर पडले आधुनिक शेतीच्या युगात ड्रोनच्या साह्याने फवारणी याआधी ही कांदे व मका पिकावर केली होती परंतु अडचणीच्या काळात द्राक्ष बागेवरही ड्रोन द्वारे फवारणी केली जाऊ शकते, व त्याचा परिणाम पिकांवर चांगला होतो वेळ श्रम व पैशाची बचत होऊ शकते

**– वैकुंठ पाटील** (द्राक्ष उत्पादक कुंदेवाडी)



इफ्कोच्या माध्यमातून मिळालेल्या ड्रोनमुळे माझ्या कुटुंबाला मोठा आर्थिक हातभार लागला आहे.आज पर्यंत आमचे शेकडो एकर क्षेत्रावर फवारणी पुर्ण केली असुन रब्बी व खरीप हंगामात ऊस ,मका ,सोयाबीन,तुर ,गहु ,कांदे या पिकांवर फवारणी सुरु आहे तर यंदा द्राक्षबागावर फवारणी सुरु केली आहे औषधामुळे शेतकरी समाधानी झाला असुन कमी किमंतीत चांगला परिणाम मिळत आहे.

**– दिपाली बापू मोरे** (ड्रोन चालक निफाड जि.नाशिक)

# नांदण्यास नकार दिल्याने पतीकडून पत्नीची चाकूने भोसकून हत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

नांदायला घेऊन जाण्यासाठी सासू सासरे व पती पाहुण्यांच्या गावी आले होते. पत्नीच्या भावाने दारातच साखरेला मारहाण सुरू केल्यामुळे रागाचे भारत पतीने धारदार चाकूने पत्नीच्या पाठीत, पोटात ,व कमरेत चाकू खुपसून गंभीर जखमी करून खून केलेली घटना घडली

**मंगळवेढा तालुक्यातील घटना**

आरती अमोल पाटील( वय ३२ राहणार मेटकरी गल्ली मंगळवेढा) असे माहित पत्नीचे नाव आहे. या अनामारीत माहीतच सासरा अंबादास पाटील( ढेकळेवाडी) भाऊ प्रसाद रामचंद्र चौगुले व आई सोनाली रामचंद्र चौगुले राहणार मेटकरी गल्ली हे गंभीर जखमी झाले आहेत ही घटना काल दुपारी तीन वाजता शनिवारच्या माहेरी घडली.

याप्रकरणी मयत आरतीची आई सोनाली रामचंद्र चौगुले यांनी फिर्यादी असून पती अमोल अंबादास पाटील, सासरा अंबादास पाटील, सासू विमल अंबादास पाटील ,यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या चार-पाच वर्षांपासून विवाहित आरती ही माहेरी येथील शनिवार पेठेत आई-वडिलांकडे राहत होत्या व पतीसोबत वाद होता.

सासरी नान्यास घेऊन जाण्यासाठी म्हणून सासू-सासरे व पती आल्यानंतर सासर्याला महुनाप्रसाद चौगुले यांनी मारहाण केल्यानंतर रागाच्या भरात होती अमोल यांनी पत्नीच्या पोटात पाटील व कमरेत धारदार चरणी चाकूने वार करून गंभीर जखमी केले.

तुला उपचार एकरीचा प्राथमिक रुग्णालयात दाखल केल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी भारतीय यांना मयत घोषित केले इतर जशी जखमींवर मंगळवेढा येथील ग्राम




ीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालय येथे दाखल केले आहे. आरती ढवळे पाटील यांच्या मृतदेहाचे शेव विच्छेदन केल्यानंतर रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले घटनेची माहिती समजतात तात्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड व पोलीस निरीक्षक दत्तात्रय गोरे गीते यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे .

या प्रकरणातील मुख्य आरोपी अमोल पाटील यास पोलिसांनी अटक केली असून या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

# वागदरी येथे स्वा. सावरकर जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/वागदरी (ता. अक्कलकोट)

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सार्वजनिक वाचनालयात महान क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास गावातील मान्यवर नागरिक, वाचनालयाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीकांत सोनकवडे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये चौळ्ळे गुरुजी, कोट्याप्पा कोठे, वागदरीचे माजी सरपंच हुचप्पा अरूणे, श्री गुरूमुर्ती निलगार, श्री पंचाक्षरी शिवशंकर पुजारी, प्रकाश निलगार, शिवशरण बटगेरी, अप्पासाहेब दणुरे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात स्वा. सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर वक्त्यांनी सावरकरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना त्यांच्या क्रांतिकारक विचारांची आणि स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वपूर्ण योगदानाची आठवण करून दिली. चौळ्ळे गुरुजी यांनी आपल्या भाषणात सावरकरांच्या समाज प्रबोधनावर आणि विज्ञानवादी दृष्टिकोनावर भर दिला. हुचप्पा अरूणे यांनी सांगितले की, सावरकर हे केवळ स्वातंत्र्यवीर नव्हते तर ते उत्कृष्ट कवी, लेखक, इतिहासकार आणि समाजसुधारक होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयाचे कर्मचारी सुरेश छुरे यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या विचारांना अनुसरून नवे पिढी घडवण्याचा संकल्प केला.

या प्रसंगी वाचनालयाच्या वतीने ग्रामस्थांसाठी विविध ग्रंथांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारलेले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय समिती आणि ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

# सरसकट शेती पिकाचे पंचनामे करा अन्यथा शासकीय आदेशाची होळी करणार : अतुल खूपसे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

सध्या माढा तालुक्यामध्ये तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या नावे एक प्रशासकीय आदेश सोशल मीडियाच्या माध्यमातून फिरत असून यामध्ये आव्हाळीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना पंचनामे होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २७ मार्च २०२३ अनुसार कमीत कमी ३३% नुकसान झालेल्या असणे बंद करत असल्याचा उल्लेख आहे वास्तविक पाहता गेले दहा दिवस सुरू असलेल्या वादळी पावसामुळे पूर्ण महाराष्ट्रात थैमान घातलेले असताना आणि शेतकऱ्यांची प्रचंड नुकसान झालेले असताना त्यांना सरकारी पंचनामेसाठी टक्केवारीची अट अन्यायकारक असते किंमत जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अतुल खूपसे पाटील यांनी व्यक्त करून शेती पिकाचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई मिळेल अशी मागणी करत असे न झाल्यास शासकीय आदेशाची होळी करणारा असल्याचे अतुल खूपसे यांनी सांगितले.



त्यावेळी बोलताना ती म्हणाली यावर्षी झालेल्या न भूतो न भविष्यात अशा प्रकारच्या पावसाने शेतकरी अक्षरशा देशोधडेला लागला आहे. फळबाग ऊस शेती भाजीपाला पिके मातीमोल झाले आहेत कित्येक ठिकाणी घरी जनावरे यांची आठवण आत हानी झाले अशात मायबाप सरकार हीच एकमेव अशा असताना तीच जर तीन वर्षांपूर्वीचा जुन्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांसोबत भेदभाव करणार असतील तर जनशक्ती शेतकरी संघटना अजिबात गप्प बसा नाही असा इशाराही त्यांनी यावेळी बोलताना दिला. कुठे पाटील यांनी आपली मागणी मारताना सांगितले की कोणत्याही शेतकऱ्यासोबत कसलाही भेदभाव न करता सरसकट १००% पंचनामे प्रशासनाने करावी अन्यथा जनशक्ती संघटना सरकारी आदेशाची होळी करून आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# उमरगा तालुका विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
उमरगा/प्रतिनिधी

उमरगा तालुका विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने एस एस सी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये कु आर्या मनोजकुमार गुरव यांनी इंग्रजी माध्यमातून ९७ टक्के गुण मिळवून यश संपादित केल्यामुळे, तसेच सौ.सुषमा विनोद गायकवाड यांना जिल्हा परिषद धाराशिव च्यावतीने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि त्यांच्या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच पूजा कोडलंगरे यांचा टेट परीक्षा पास होऊन महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद शिक्षिका म्हणून नियुक्ती झाल्यामुळे विज्ञान मंडळाच्या वतीने शाल श्रीफळ फेटा देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वजीत दुबे , विज्ञान मंडळाचे अध्यक्ष विनोद गायकवाड कार्याध्यक्ष मनोजकुमार गुरव, सदस्य संतोष राठोड, संतोष शहापुरे,पांडुरंग आवटे, रवींद्र पोतदार त्यांची उपस्थितीत होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली वेदपाठक , तर आभार दर्शना शाईवाले यांनी मानले.

# जावळी येथील सालेहा शेख ९३ टक्के गुण घेऊन दहावी उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा/अमर जाधव

औसा तालुक्यातील जावळी येथील अल्पभुधारक,सर्वसामान्य शेतकरी रियाज शेख यांची कन्या सालेहा रियाज शेख विद्यार्थीनीने दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश संपादन करुन ९३.००% गुण घेउन बोर्डात पहीला येण्याचा बहुमान पटकावला ,आज सालेहा रियाज शेख यांचा परीवाराच्या वतिने पेढे भरउन आनंदोत्सव साजरा करण्यात आला ,सालेहा शेख या विद्यार्थनिने अथक परीश्रम जिद्ध,चिकाटी व मेहनतीच्या जोरावर कुटलाही घरी शैक्षणिक वारसा नसताना स्वकर्तत्वाने अहोरात्र अभ्यास करुन बोर्डात पहीला येण्याचा बहुमान मिळवत आपल्या शेतकरी आई वडीलांच्या कष्टाचे सोन केल व बोर्डात पहिला येण्याचा मान मिळवला यावेळी सालेहा रियाज शेख हिचा कौंटोबीक सत्कार करण्यात आला.

यावेळी मौला पटेल ,चाँद पटेल शालेय समिती अध्यक्ष विठ्ठल थोरात , शालेय व्यवस्थापण समिती उपाध्यक्ष कलीम पटेल , शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष दादा सय्यद , शिलार पटेल यासीन पटेल , शिक्षणतज्ञ महेबुब पटेल करीम पठान, डॉ शंभुराजे भोसले ,रियाज पटेल , असीफ पटेल सादिक पटेल धनराज बनसोडे . कासिम पटेल खलील पठान ,संतोश झिरमीरे ,बाळु कांबळे ,आमोल सातपुते ,अलीम पटेल ,तुळशिराम आळणे,सतिश आळने , जिल्हा परीषद शाळेचे मूख्याध्यापक चव्हान मॅडम, बिराजदार सर, कदम सर,मूख्याध्यापक दंडे सर,माशाळकर सर,सह शिक्षक व जावळी ग्रामस्थांनी सालेहा रियाज शेख विद्यार्थीनीचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १११ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)

: फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १६ मे १९३८ ला चिपळूण येथे म्हटल्याप्रमाणे जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा. या विधानाच्या ८७ व्या वर्धापनानिमित्त १११ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १८ मे २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाज जीवनात कार्यरत सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील विविध पक्ष संघटनांनी व्यापक दृष्टीकोन ठेवून पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा सर्व भागात अस्तित्वात असणाऱ्यांशी समन्वयाने कार्य केले पाहिजे. यात काही वक्त्यांनी शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा याची जाणीव करून दिली आहे. मात्र आपण हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, जे काही व्यक्त केले जाईल ते संदर्भासहीत असावे. तर ९ मार्च १९२४ ला मुंबई च्या दामोदर हॉल येथे संपन्न झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा (चेतवा) आणि संघटीत करा. जे पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला स्थापन केलेले पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले होते. या संदेशाचे मर्म समजून घेऊन जसेच्या तसे प्रस्तुत करावे. जेणेकरून त्याचे दूरगामी परिणाम पहायला मिळतील. श्रोत्यांनी कुठल्याही कार्यक्रमाला सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत ऐकले तरच त्यांचे त्या अनुषंगाने समर्पक मत तयार होऊ शकेल. खोती पद्धत नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भूमिका पार पाडली परिणामी २९ सप्टेंबर १९५० ला कायद्याने ही बंद करण्यात आली. करिता शोषण मुक्त समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक ते शिक्षण सर्व नागरिकांना दिले पाहिजे. म्हणून २५ डिसेंबर १९२७ ला महाड सत्याग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, छोटा उद्देश ठेवणे, हा गुन्हा आहे. तर पुढे जाऊन १६ मे १९३८ ला जीवनात सर्वोच्च स्थान प्राप्तीची महत्वाकांक्षा जोपासा असे म्हटले होते. याची जाणीव ठेवून सदरील विधानाच्या ८७ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान प्रासंगिकता समजून घेण्यासाठी आपण चर्चा आयोजित केली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना स्वाभीमानी पँथर जनरल कामगार संघटनेचे संस्थापक सचिव सोमनाथ महापुरे म्हणाले की तरुण, युवक चळवळीत अग्रेसर होण्यासाठी आपण विचार स्थानांतराची प्रक्रिया राबविली पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे या चळवळीचा कारवाँ पुढे घेऊन जाता आला नाही तर किमान मागे तरी जाऊ देऊ नये. ही अपेक्षा पूर्णत्वास नेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. आपण सर्व जण विविध जातीत विभाजित असल्यामुळे सर्वांनी आपापल्या जातीत जन्माला आलेले महापुरुषांच्या वाटण्या केल्याने शत्रूनी आपल्या चटण्या केल्या आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना जिल्हा व सत्र न्यायालयाचे एडव्होकेट एम. एस. धिवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानरूपी संदेशातून प्रेरणा घेऊन ते संदेश जनसामान्यांपर्यंत प्रसारीत करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वतनाच्या इनामी जमिनी धन दांडग्यांनी लाटल्यात. त्याकाळी शेतात गवताचे छत निर्माण केले जायचे, त्यावर पण कर लावला जात असे. शेती कसायला पैसा द्यायचे पण उत्पन्न आल्यावर सारे घेऊन जायचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर शोषण व्हायचे.

याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, हा विषय १९३८ चा असला तरी पुढील काळात त्यांनी भारताचे संविधान लिहिले आहे. त्यामुळे आपण आज उभे आहोत. विलास कटारे म्हणाले की, जिथे अशाप्रकारच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात, तिथे समस्या निर्मूलनासाठी चर्चा होत असतात. हे वज्जीगणाचे खास वैशिष्ट्य होते, जे कार्यशाळेने अवलंबिले आहे. माणूस केंद्र बिंदू ठेवून पुढे चालत राहिले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, त्या काळात खाेती पद्धत फोफावली होती. शेतसारा वसूल करणा-यांना खोत म्हटले जात होते. प्रतीक पंचशील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास नोंद घेईल एवढे महान कार्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भुषण गवई यांनी या विधानाची पूर्तता केली आहे.

प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रतीक पंचशील यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला प्रतीक पंचशील, एड. एम. एस. धिवार, उद्योजक मिलिंद बागूल, विलास कटारे, सोमनाथ महापुरे, धनराज कापडणे, राहूल मेश्राम, सोहेल पटेल इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# निफाड बस स्थानकासमोरील वाहतूक कोंडी सुटणार

## शिवसेना शहर प्रमुख संजय धारराव यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : निफाड बस स्थानका समोरील अनेक वर्षापासून चा वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी निफाड शिवसेना शहर प्रमुख संजय धारराव यांनी आंदोलना चा इशारा दिल्यानंतर प्रशासन हे खडबडून जागे झाले व या काम ाला सुरुवात केली,

निफाड बस स्थानका समोरील रस्त्यावरील अतिक्रमणे हटवावीत तसेच बस स्थानकात येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या बस गाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करावा बस स्थानकाच्या गेटवर पडलेले खड्डे तात्काळ बुजवावेत तसेच परिसरात होण-ारी वाहनांची कोंडी कमी होण्यासाठी रस्ता दुभाजक तोडण्यात यावेत यासाठी निफाडचे शिवसेना शहर प्रमुख संजय धारराव यांनी



लासलगाव सागर प्रमुख सविता काळे यांच्याशी पत्रव्यवहार केला होता त्यांनी रस्त्याची अडचण सांगत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बोट केले सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रकाश घोडे यांनी लवकरच दुभाजक तोडू असे सांगूनही या कामाकडे दुर्लक्ष केले अखे-रीस संजय धारराव यांच्यासह कार्यकर्त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला व प्रशासन खळबळून जागे झाले

लासलगाव बस आगार प्रमुख सविता काळे, वाहतूक व्यवस्थापक नितीन बोठे, वाहतूक नियंत्रक विजय गवळी, वीज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता जाधव, सार्वजनिक बांधकाम शाखा अभियंता सागर भांगरे ,संदीप मोगल, निफाड नगरपंचायत तिचे मुख्य अधिकारी अमोल चौधरी, आदी अधिकारी निफाड बस स्थानकात दाखल झाले व संजय धारराव यांनी बसस्थानकातील समस्यांचा पाढा वाचला याची दखल घेत अखेर प्रशासनाला जाग आली व त्यांनी कामाला सुरुवात केली. यामुळे परिसरात होणारी वाहनांची कोंडी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे, धारराव यांनी हा प्रश्न लावून धरल्याने यश आले असून त्यांना शिवसेना ठाकरे पक्षाचे रमेश जेऊघाले, योगेश कुंदे, राजूहर गावकर, सचिन गीते ,बाळासाहेब डांगरे ,आकाश धुमाळ ,यांनी समर्थन दिले होते.

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्यापासून प्रेरणा घ्यावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध आंदोलन करून देशभक्तीचा आदर्श घालून देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्यापासून युवकांनी प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद सम ाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने सावरकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मल्लिकार्जुन मसुती होते.यावेळी



सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा हे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणा-ले की, इंग्रजाविरुद्ध सशस्त्र क्रांती करायची असेल तर संघटनेची आवश्यकता आहे, म्हणून त्यांनी अभिनव भारत संघटनेची स्थापना केली. म्हणून त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन केंद्र सरकारने दहशतवादी विरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आणि दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. तसेच सिंधू नदीचे पाणी करार स्थगित केले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले तर आभार प्रा शितल फुटाणे त्यांनी मानले कार्यक्रमास प्रा राजशेखर पवार, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा शिल्पा धूमशेट्टी, प्रा शितल टिंगरे, प्रा सविता कळ्ळीमठ उपस्थित होते.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार वंदनीय**

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या साहित्य व काव्यातून देशभक्तीचा आदर्श घालून दिला. त्यांचे विचार वंदनीय होते. त्यांच्या विचारापासून प्रेरणा घेऊन युवकांनी देशासाठी जीवन समर्पित करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे भावनिक प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

# सिन्नूर येथे सच्चीदानंद शिवयोगी यांच्या ३१व्या यात्रा उत्सव साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुकातील सिन्नूर येते श्री संच चिदानंद शिवायोगी शांती मठ सिन्नूर श्री परमपूज्य जगदिश्वरनंद महास्वामीजी् यांच सानिद्दत ३१व्या यात्रा महोत्सव उत्सव साजरा करण्यात आले. प्रारंभी संगमेश्वर मंदिर पासुन रतायत्र मिरवणूक काढण्यात आले यावेळी शिवालिंग्या पुजारी, चंद्रकांत तोळानूर, विश्वनथ सुतार, सिद्धारम जेव-र्गी, राजशेखर हौदे, सतलिंगप्पा जेवर्गी, सतलिंगप्पा सोन्नदा, महादेव हौदे, बसन्न पाटील, गुरुसिद्दा तोळानूर, सुभाष उजनी, डुंदेशा जेवर्गी, शेकर स्वामी,निंगप्पा हौदे,रविकुमार जेवर्गी,उपसरपंच प्रकाश कालसगोंडा, संगमेश सुतार, शिवशरण जेवर्गी, श्रीकांत पाटील , पत्रकार निंगप्पा निंबाळ,सांगन्ना उजनी, दत्ताराया जेवर्गी, काशिनाथ सुतार, प्रवीण स्वामी, सरपंच कल्पना सोनकांबळे, मंतप्पा जेवर्गी, शेट्टेप्पा बाजत्री, भुताळी कळसगोंडा, जगदीश हौदे, जगदीश उजनी, संगमेश जेवर्गी, अण्णाराव हौदे, , श्रीमंत अल्लागी, शिवायोगी कालसगोंड, गंगादार तोळानूर, चेन्नप्पा तोळानूर, लक्ष्मीपुत्र अल्लागी, बागेश यारगळ, महादेव गुडडोदागी, गुरुपदप्पा कुंभार,शिवाबसव गुडोडगी, सैदप्पा चांडके, हणमंत जामदार,गुंडाप्पा काडगची व गावातील प्रतिष्ठात नागरिक व कर्नाटक महाराष्ट्र तील सद्दाभक्त उप-स्तित पालकी मेरूवणूक संपन्न करण्यात आले



**शनिशिंगणापुरात शनिरत्न पुरस्काराचे वितरण** — **गहिनीनाथ औसेकर महाराज**

# शनिरत्न पुरस्कार शनिदेवाचा आशिर्वाद म्हणून स्विकारला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शनिशिंगणापूर/प्रतिनिधी- आज सन्मानपुर्वक देण्यात आलेला शनिरत्न पुरस्कार मी पुरस्कार म्हणून नव्हे तर शनिदेवाचा आशिर्वाद म्हणून स्विकारला आहे. पुरस्कार मिरविण्यात अहंकार निर्माण होतो तर आशीर्वादाने पदरी पुण्य वाढते. लाखो, कोट्यावधी विठ्ठल भक्तांचा सेवेकरी म्हणून काम करण्यात आत्मिक समाधान असून आनंदाला आनंद देणारे पंढरपूरचे तिर्थक्षेत्र अधिक वृध्दींगत करण्यासाठी हाती घेतलेले सेवाकार्य निरंतर सुरु राहील असे प्रतिपादन विठ्ठल-रुख्मीणी संस्थान(पंढरपूर) चे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले.



शनिशिंगणापुर येथील शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव बानकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विश्वस्त मंडळाच्या वतीने देण्यात येणारा एकविसावा शनिरत्न पुरस्कार औसेकर महाराज यांना प्रदान करण्यात आला यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आदर्शगाव समितीचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार होते. देवगड संस्थानचे प्रमुख महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन औसेकर महाराज यांचा सन्मान करण्यात आला.

पैठण येथील संत एकनाथ महाराजांचे वशंज प्रविण महाराज गोसावी, कारभारी महाराज झरेकर, संत ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त विश्वासराव गडाख, अतुल म हाराज आदमाने, शहाजी जोशी, श्रीरंग महाराज औसेकर, कारभारी महार-ाज पंडित, देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर,उपाध्यक्ष विकास बानकर, विश्वस्त मंडळ तसेच माजी उपाध्यक्ष सुरेश बानकर, माजी विश्वस्त सयाराम बानकर आदी उपस्थित होते.

शनैश्वर देवस्थानचे चिटणीस आप्प-ासाहेब शेटे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष भागवत बानकर,उपाध्यक्ष विकास बानकर,कार्यकारी अधिकारी जी के दरंदले सहायक कार्यकारी अधिकारी नितीन शेटे व सर्व विश्वस्तांनी उपस्थित संत,महंत व मान्यवरांचा सत्कार केला. लेखन कार्याबद्दल डॉ. बापूराव देसाई व विश्वस्त डॉ.शिवाजीराव दरंदले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी स्व. बाबुराव बानकर यांच्या माहितीपर पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

महंत भास्करगिरी महाराज यांनी गाडी,माडी आणि संपत्ती येथेच राहणार असल्याने प्रत्येकाने आत्मिक शांतीसाठी सुविचार,सदाचार आणि सर्वांना बरोबर घेऊन जात माणुसकीचा धर्म जपावा असे सांगून दळणवळण करीता रस्ते करताना व देवस्थानांचा विकास करताना काही लोक दुखी होतील मात्र त्यातून खरा विकास साधला जाणार असल्याचे सांगितले.

औसेकर महाराज यांनी पांडुरंग, शनिदेव व गुरु परंपरेला वंदन करून देवगड तीर्थक्षेत्र म्हणजे भुलोकीचा स्वर्ग असून देवाला हेवा वाटावा असे क्षेत्र असल्याचे सांगितले.

पद्मश्री पवार यांनी अध्यक्षीय भाषणात संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महार-ाज व संत एकनाथ महाराज यांचे अभंग व भारुडांचा संदर्भ देऊन पर्यावरण व अध्यात्मावर प्रबोधन केले. भावी पिढींचा विचार करुन शाळेत हरिपाठ व संत चरित्र सांगितले तर भविष्यातील सामाजिक हानी टळेल असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश हापसे यांनी केले. आभार शिवाजीराव दरंदले यांनी मानले.

# घरफोडी करणारे चोरटे निफाड पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड

निफाड तालुक्यातील रामाचे पिं-पळस येथे दिवसाढवळ्या सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेचारच्या दरम्यान किरण चंद्रभान आहेर यांच्या घराचा मुख्य दरवाजा कोंडा व कुलूप तोडून दोन लाख पंधरा हजार रुपये किमतीच्या सोन्या-चांदीचे दागिने व लॅपटॉप ची चोरी झाली होती, याबाबत निफाड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती निफाड पोलिसांनी अवघ्या बारा तासात या प्रकरणातील आरोपींच्या मुस्क्या आवळल्या





निफाड पोलीस प्रशासन उपविभागीय अधिकारी डॉ. निलेश पालवे यांचे सूचनेनुसार व पो-लीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शना खाली तपासाची सूत्रे हलवत घटनास्थळी चौकशी व निरीक्षण करून . गुन्ह्यातील आरोपी सागर दत्तात्रेय गरड ३३ पत्नी रोहिणी सागर गरड वय ३३ दोघेही राहणार शिवकृपा समोर आडगाव व पंचकृष्ण लॉन्स समोर सुखस-ागर बिल्डिंग कोणार्क नगर आडगाव त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असताना संशयतांनी गुन्ह्या-तील सोन्याची दागिने, स्विफ्ट कार,.. लॅपटॉप व मुद्देमाल काढून दिल......

**बारा तासात लावला तपास, पोलिसांचे सर्वत्र कौतुक**

घटनेत ८९ हजार ७५० रुपये किमतीची सोन्याची अंगठी,पाच हजार ९२० रुपये किमतीचे सफेद धातूचे तोरडी ,तिनहजार २५० रुपये किमतीचे पायातील तोरड्या, एक हजार ६८० रुपये किमतीच्या धातूचे कडे,, ७६० रुपये किमतीचे जोडवे चार नग ,तीन लाखा-ची स्विफ्ट कार, सहा हजार २०० रुपयांची रोकड, तसेच पाच हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल, १० हजार रुपये किम तीचा लॅपटॉप, असा मुद्देमाल निफाड पोलिसांनी हस्तगत केला, केला असून निफाड पोलिसांना यश आले , या कामी निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव ,सहा पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील, पो-लीस हवालदार कपालेश्वर ढिकले, अनिल शेरेकर ,भास्कर पवार, पुनम शिंदे, सांगळे,विनोद जाधव, धनंजय जाधव ,राजेंद्र दरोडे ,राजू मनोहर ,रंगनाथ सानप, हेमंत गिलबिले ,प्रदीप बहिरम,आदींनी परिश्रम घेतले सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

**✻ वैशिष्ट्ये ✻**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

**✻ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ✻**

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

✻ आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
✻ प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
✻ प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
✻

**✻ महत्वाची सुचना ✻**

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्प्यावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्व:ताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

**✻ प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ✻**

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.